# प्रेसनोट

महंमदवाडी भागातील लायसेन्स प्लंबर रक्कम रु. ५०,०००/- मागतात या बातमीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती खालीलप्रमाणे :

पुणे महानगरपालिकेमार्फत नवीन नळजोड देताना नळजोड आकार आणि व्यास यानुसार महानगरपालिकाकडे भरावयाची रक्कम मा. मुख्य सभा ठराव क्र. ८०९, दिनांक १६/२/२०१६ अन्वये मान्य केलेली असून, सदर ठरावाची प्रत महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त प्रत्यक्ष नळजोड मान्यतेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार लायसेन्स प्लंबर यांचेमार्फत नळजोडाचे प्रस्ताव महानगरपालिकाकडे सादर करून, पाणीपुरवठा खात्यामार्फत जागा पाहणी करून नळजोडस परवानगी देण्यात येते. यासाठी सन २०२६-२०२७ सालाकरिता खालील प्रमाणे शुल्क आकारले जाते :

| आकार | अंदाजे सदनिका संख्या | घरगुती नळजोड आकारणी रक्कम रु | बिगर घरगुती नळजोड आकारणी रक्कम रु | वैयक्तिक अनामत रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1/2 इंची (आर्धा इंची) | १२ पर्यंत | 1475/- | 3104/- | वैदकीय - 10545/- |
| 3/4 इंची (पावना इंची) | २४ पर्यंत | 2946/- | 6049/- | भाडेकरू - 12945/- |
| 1 इंची (एक इंची) | ४८ पर्यंत | 7757/- | 14272/- | |
| **1 1/2** ते 2 इंची (दीड ते दोन इंची) | १९२ पर्यंत | 19394/- | 62053/- | |
| 2 1/2 ते 3 इंची (अडीच ते तीन इंची) | ३८४ पर्यंत | 29477/- | 80667/- | |
| 3 इंची पुढे (तीन इंची पासून पुढिल) | ३८४ च्या पुढे | 39810/- | 119452/- | |

यामध्ये महानगरपालिकेच्या पाण्याच्या लाईनपासून ते पाण्याच्या मीटरपर्यंत (इमारतीच्या आत साधारण दोन मीटरपर्यंत) सर्व कामे करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असून महानगरपालिकेमार्फत सदर काम करण्यात येते. मीटरपासून पाण्याच्या टाकीपर्यंतचे पुढील काम आणि नव्याने बांधकाम करण्यात आलेल्या इमारतींची अंतर्गत प्लम्बिंगची सर्व कामे लायसेन्स प्लंबर यांचेमार्फत करून घेणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुद क्र. परिशिष्ट १० मधील १८ (२) अन्वये बंधनकारक आहे. त्यामुळे लायसेन्स प्लंबरमार्फत महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर करण्यात येतो आणि अंतर्गत सर्व कामे गुणवत्तापूर्ण आणि तांत्रिकदृष्ट्या योग्य प्रकारे करून घेण्याची जबाबदारी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३७५ अन्वये संबंधित लायसेन्स प्लंबर यांची असते.

तांत्रिक कामाची सल्ला फी, प्लंबर सल्ला फी आणि अंतर्गत कामाच्या प्लंबरच्या मजुरीचा खर्च प्रत्येक इमारतीचा वेगवेगळा असून, याबाबत महानगरपालिकेचे सध्या धोरण नसून सदर धोरण लवकरच ठरविण्यात येणार आहे. महंमदवाडी येथे नव्याने बांधण्यात आलेल्या टाक्यांच्या भागात साधारण ६०-७० इमारतींना पाण्याची उपलब्धता नसल्यामुळे अद्यापि नळजोड मान्य करण्यात आलेले नाहीत. त्यांना नळजोड देण्यासाठी शनिवार दिनांक ९/५/२०२६ रोजी सदर भागातील नागरिकांना मदत करण्यासाठी नळजोडासाठीचा मदतकक्ष आयोजित केला होता. यामध्ये माहिती घेऊन आजपावेतो ४१ नळजोडासाठी

अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्याचप्रमाणे यापुढ्ये देखील आवश्यकतेनुसार या ठिकाणी मदतकक्ष आयोजित करण्यात येणार आहे.

सदर भागामध्ये दोराबजी पॅराडाईज येथील तीन टाक्या नव्याने कार्यान्वित करण्याचे काम अंतिम टप्प्यामध्ये असून, या भागामध्ये सुमारे १२०० - १५०० सोसायट्या/इमारतीना यापूर्वी नळजोड देण्यात आलेले असून, इतर ठिकाणावरून रामटेकडी व बकरीहिल या टाक्यांवरून पाणीपुरवठा करण्यात येतो. तथापि, या टाक्यांपासून सदर सोसायट्याच्या वितरण जलनलिकेच्या शेवटच्या भागत आणि उंचावरील भागात असल्याने या सोसायट्याना अत्यल्प पाणीपुरवठा होतो. सदर नव्याने बांधलेल्या टाक्या कार्यान्वित केल्यानंतर या सोसायट्यांना पाणीपुरवठा करणा-या मुख्य पाण्याच्या लाईन जुन्या टाक्यांवरून बंद करून नवीन टाक्यांवर जोडण्यात येणार आहेत. त्यामुळे यापूर्वीचे नळजोड असलेल्या जुन्या सोसायट्याना कोणतेही नवीन नळजोड घेण्याची आवश्यकता नसून सद्यस्थितीत कोणतेही नवीन नळजोड देण्यात येणार नाहीत.

तरी, या भागातील सोसायट्याना आणि नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे कि, संबंधित प्लंबरकडून कोणत्याही प्रकारची अवाजवी मागणी केल्यास याबाबत कार्यकारी अभियंता, लष्कर पाणीपुरवठा विभाग, सेंट बिशप हायस्कूल जवळ, जनरल भगत मार्ग, पुणे- 01 यांचेकडे तात्काळ लेखी स्वरुपात तक्रार करण्यात यावी. या अनुषंगाने कोणताही पत्रव्यवहार करण्यासाठी उपरोक्त पत्त्यावर संपर्क साधू शकता. तसेच, वेळोवेळी या भागामधील नागरिकांना माहिती देण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत मदतकक्ष आयोजित करण्यात येणार आहेत.

याव्यतिरिक्त संबंधित ५७५ लायसेन्स प्लंबरची यादी आणि दूरध्वनी क्रमांक पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या ऑनलाईन वेबसाईटवर उपलब्ध असून, प्लंबरकडून कोणत्याही प्रकारची अवाजवी मागणी करण्यात आल्यास या यादीतील कोणत्याही अन्य लायसेन्स प्लंबरची नेमणूक संबंधित सोसायटी करू शकते.

(नंदकिशोर जगताप)
मुख्य अभियंता (पाणीपुरवठा)
पुणे महानगरपालिका.

संदर्भ : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम:- ३७२, ३७४, ३७५ व परिशिष्ठ १०.